
ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Issue-16, Vol-08, Oct. to Dec.2016



Editor
Dr.Bapu G. Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Oct. To Dec. 2016
Issue-16, Vol-08

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

Vidyawarta Research Journal is "Printed by Harshwardhan Publication Pvt.Ltd. Published by Ghodke Archana Rajendra and Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post.Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor Dr. Gholap Bapu Ganpat.

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
Mobi. 09850203295, 07588057695

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

14) Subjective Well being of Hindu and Muslim Powerloom Workers
Praful pawar, Jalgaon, Dr. Jayprakash N. Choube, Sakri

15) GST as Revolution in Indirect Taxes in Indian
Shri. V. D. Golesar, Nashik
|| 65

16) PRIVATIZATION, GLOBALIZATION AND AUTONOMY IN EDUCATION ........
Dr. Anju Verma, Sikkim
|| 70

17) CAREER MATURITY OF SECONDARY SCHOOL TRIBAL STUDENTS ..........
Amulya Kumar Acharya, Sodepur
|| 78

18) The Political History of "Salam" in Almora, Uttrakhand
SHAILESH BHANDARI, Rudrapur (US Nagar)
|| 84

19) SWAMI VIVEKANADA'S CONCEPT OF CULTURAL NATIONALISM
Smt. B.S.Shylaja, Mysuru
|| 88

२०) कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार प्रतिबंध कायदा आणि वास्तव ..........
डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर, बीड
|| 91

२१) भावगीत सादरीकरणाची कौशल्ये
प्रा. महेश शामराव दाडगे, परळी वैजनाथ
|| 95

२२) महाराष्ट्राच्या नाट्यपरंपरेच्या इतिहासातील सुवर्णपान: 'झाडीरंगभूमी'
प्रा. डॉ. धनराज खानोरकर, जि–चंद्रपूर
|| 96

२३) आदिवासी समाजातील स्त्री
प्रा. केंद्रे सिता लक्ष्मणराव, जि. बीड
|| 100

२४) आघाडीचे राजकारण आणि भारतीय संघराज्य
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबूराव, जि.नांदेड
|| 101

२५) सन्त पूजेची वैदिकता
शामराव श्रीनिवासराव नेरकर
|| 107

२६) महिलांच्या सबलीकरणात स्वयंसहाय्यता बचत गट
प्रा. महेश शिवशंकरअप्पा निर्मळे
|| 108

२७) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
डॉ. श्री. निळकंठ रामचंद्र व्यापारी, जि.ठाणे
|| 110

ADARSH VIDYA ... EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded

आदिवासींमध्ये अनेक प्रकारची विवाह होतात. बहुपतित्वाची प्रथा,घटस्फोट घेतल्यानंतर परत असलेल्या व्यक्तीबरोबर राहू शकतात पुरुषप्रधान संस्कृती आहे. तिथे पण दुय्यम स्थान आहे. कुटुंब व सामाजिक,धार्मिक कार्यात महत्वाचा सहभाग असतो.

निष्कर्ष:-

१) आदिवासही जमातीत स्त्रियांचे जीवन अतिशय कष्टमय असून कनिष्ठ स्थान आहे.

२) आदिवासी समाजात घटस्फोट घेता येतो व पुनर्विवाह करता येतो.

३) आदिवासी समाज हा पुरुष प्रधान संस्कृती आहे त्यामुळे मुलीपेक्षा मुलगाच श्रेष्ठ मानला जातो.

४) आदिवासी समाजात कौटुंबिक व धार्मिक क्षेत्रात महत्वपूर्ण वाटा आहे.

५) आदिवासी समाजात जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य आहे.

संदर्भ ग्रंथ :-


१) बी.एम.क-हाडे – आदिवासी समाजाचे समाजशास्त्र,पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर दु.आ.२०१० पृ.३०

२) विलास सांगवे_ आदिवासी सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशक दु.आ. १९७८/१९९० पृ.१४३

३) विलास सांगवे_ आदिवासी सामाजिक जीवन, पॉप्युलर प्रकाशक दु.आ. १९७८/१९९० पृ.१४३

४) दादा गोरे सहयाद्रीतील आदिवासी महादेव कोळी आदिम साहित्य प्रकाशन, पुणे तृ.आ.२००७,पृ.२०१

५) एस.जी.देवगावकर/शैलजा देवगावकर गोंड, परधान आवि कोलाम.श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, प्र.आ.२००१ पृ.१३२


□□□

24

# आघाडीचे राजकारण आणि भारतीय संघराज्य


प्रा. डॉ. लमाटे रत्नाकर बाबूराव

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख

देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता.देगलूर जि.नांदेड


ADARSH [illegible]ARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

**प्रस्तावना :**

भारतीय संघराज्याच्या संस्था आणि कार्यप्रणालीच्या विविध घटकांचे निर्धारण करण्यात भारतीय राजकारणाची भुमिका महत्वाची आहे. भारतीय संविधानकर्त्यांनी ज्या दुरदृष्टीने संविधानात विविध तरतुदींचा समावेश करुन संविधानाची निर्मिती केली. त्यात भारतीय राजकारणातील विविध राजकीय पक्ष आणि घटकांनी दुरुस्ती केली किंवा त्यास विद्रुप बनवले असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. उदाहरणार्थ राज्यपालाची संवैधानिक बाजू बऱ्याच प्रमाणात केंद्र शासनाच्या सदबुध्दि व राज्याप्रति सन्मानाची भावना ठेवून कार्य करण्याची आहे. परंतु कालांतराने १९७० च्या दशकापासून केंद्र शासनाने या पदाचा वापर राजकीय दबावाचे तंत्र म्हणुन केला. ज्यामुळे या पदाच्या संवैधानिक मर्यादांचे उल्लंघन झाले. राज्यपाल हे पद केंद्र राज्य संबंधात एक महत्वपुर्ण अडथळा म्हणुन समोर आले. त्यामुळे प्रस्तुत: लेखात भारतीय राजकारणचे एक प्रमुख अंग म्हणजे आघाडी राजकारणाचे भारतीय संघराज्यावर पडणारे सकारात्मक व नकारात्मक प्रभावांची विश्लेषणात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संधोधनात्मक आराखडा :**

याविषया अंतर्गतचे चिंतन केंद्रात आघाडीचे शासन असतानाच्या काळात होणे अपेक्षित होते. परंतु ते चिंतन केंद्रात एक मजबुत व शक्तिशाली स्पष्ट बहुमतातील शासन असताना होत आहे. केंद्रात जरी स्पष्ट बहुमतातले शासन असले तरी राज्यात मात्र कांही अपवाद वगळता आघाडीचे शासन जाणवते. तर कांही राज्यात जनता स्पष्टपणे एकाच राजकीय पक्षाच्या मग ते राष्ट्रीय असो की प्रादेशिक पक्षाच्या मागे भक्कमपणे उभी रहात आहे. या पार्श्वभुमीवर आघाडीच्या राजकारणाचा भारतीय संघराज्यावर होणारा सकारात्मक व

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

नकारात्मक प्रभाव जाणून घेण्याच्या उद्देशाने हा लेख प्रपंच करण्यात आला. शासन हे आघाडीचे असो की स्पष्ट बहुमतातील त्याचा परिणाम संघराज्य व्यवस्थेवर होतच असतो. परंतु दोन्हीपैकी कोणत्या शासनाने भारतीय संघराज्याला अधिक प्रभावीत केले ? या प्रश्नाचे उत्तर माझ्या मते आघाडीच्या राजकारणात असावे. याचा अर्थ आघाडीचे शासन व राजकारणाने भारतीय संघराज्यात नवनवीन प्रवाहांना जन्म दिला हे गृहीत धरुन या विषयातील अनुबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत विषयातील एक भाग जरी प्रासंगिक वाटत नसला तरी तो या देशाच्या इतिहासातील एक सुवर्णपान आहे. त्या सुवर्णपानाने भारतीय संघराज्यावर कोणकोणती सुवर्णाक्षरे लिहिली हे शोधण्याच्या जिज्ञासेने हा लेख प्रपंच होत आहेत. या लेख प्रपंचाला पुर्णत्वास नेण्यासाठी आघाडी शासनावर अनेक लेखक व अभ्यासकांनी नोंदवलेल्या निरीक्षणाचा आणि विस्तृत मांडणीचा आधार घेण्यात आला आहे. अलिकडे इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमातुन अशा निरीक्षणास योग्य पध्दतीने नोंदवले जात आहे. ज्यामुळे भारतीय लोकशाही दिवसेंदिवस सुदृढ व सक्षम बनत आहे.

**भारतीय संघराज्याचे स्वरुप :**

भारतात संघराज्याची निर्मिती एका निश्चित राजकीय परिस्थितीअंतर्गत करण्यात आल्यामुळे त्याची कांही खास लक्षणे स्पष्ट होतात. वास्तवतेत संघराज्याच्या ज्या स्वरुपाचे अनुकरण अमेरिकेने कले त्यास जशास तसे भारतात लागु करणे शक्य नव्हते. १९४७ च्या फाळणीशिवाय इतर अनेक परिस्थितीजन्य अडथळयामुळे होते. ज्यामुळे अमेरिकन संघराज्याचे प्रारुप जशास तसे स्विकारण्यात आले नाही. संघराज्याचा अमेरिकन नमुना राज्यांची स्वायत्ता अधिक मर्यादित ठेवणारा आहे. या नमुन्या अंतर्गत केंद्र शासनाचे कांही राष्ट्रीय महत्वाचे कार्य व अधिकारांना स्पष्ट करुन शासनाचे सर्व कार्य व अधिकार राज्यास सोपवण्यात आले. तसेच अशी ही तरतुद आहे की, संघातील सर्व राज्य समान असतील तसेच त्यांच्या अधिकारांना संघ शासनाच्या हस्तक्षेपापासून दूर ठेवण्यात आले. अशा प्रकारे अमेरिकन संघराज्य व्यवस्थेत राज्यांना प्राथमिकता देण्यात आली. तसेच केंद्राला राष्ट्रीयदृष्टया महत्वाचे कार्य व अधिकार सोपावण्यात आले. अमेरिकन संघराज्य प्रारुपाच्या तुलनेत भारतीय संघराज्याची दशा व दिशा पुर्णतः भिन्न आहे. भारतीय संघराज्य ज्यास संघराज्याचे एक प्रारुप समजले जाते. वास्तवतेत ते संघराज्याचे विशुध्द रुप आहे जे भारतीय परिस्थितीनुसार एका व्यवस्थेत स्थापित झाले. त्यांच्या अनेक वैशिष्टयापैकी दोन महत्वाचे आहेत. एक केंद्र राज्यात सत्ता आणि कार्यांच्या विभाजनात केंद्र शासनास अधिक श्रेष्ठत्व देते. दुसरे कांही विशिष्ट परिस्थितीत संपुर्ण संघराज्याचे एकात्म शासन व्यवस्थेत परिवर्तन करुन त्या अंतर्गत राज्यशासन [illegible] बनतात. अशा प्रकारे अमेरिकन संघराज्य प्रारुपाच्या तुलनेत भा[illegible] संघराज्याने फक्त राज्यास दुय्यम दर्जाचे अंग मानले तर काही विशिष्टप्रसंगी त्यांस अस्तित्वशून्य बनवले. यापैकी कोणते संघराज्याचा अमेरिकन नमुना श्रेष्ठ का भारतीय नमुना कनिष्ठ ? असे मानणे उचित नाही. तर भारतीय संविधानकर्त्यांनी राज्यांच्या स्वायत्तेला व त्यांच्या अधिकारांना अधिक महत्व देण्याऐवजी देशाची एकता व अखंडतेला अधिक महत्व दिले. त्यानुसार भारतीय संविधानात संघराज्य व्यवस्थेचा विविध तरतुदींच्या नोंदीनंतरही भारतीय संविधानकर्त्यांचे हे निश्चित व दृढ मत होते की, भारतीय संघराज्य व्यवस्था देशात उपलब्ध व भविष्यातील परिस्थितींना हाताळण्यासमोर ठेवून अशी बनवण्यात आली. यात केंद्र शासनाला घटनात्मक तरतुदींचा राजकीय लाभासाठी दुरुपयोग करण्याची मान्यता दिली नाही. घटनाकर्त्यांची नेहमी अपेक्षा होती की, घटनात्मक तरतुदींचा परिणाम केंद्र शासनाने प्रयत्न करावे की, संघराज्य व्यवस्थेच्या मुलभूत तत्वांचा सन्मान करावा संघराज्य व्यवस्थेचे विभिन्न पक्ष या व्यवस्थेत आपली योग्य भागीदारी योग्य व पर्याप्त प्रमाणात निभावतील.

संविधान कर्त्यांची वरील अपेक्षा पुर्ण करण्यासाठी भारतीय संघराज्य व्यवस्थेचे परिचालन करणाऱ्या पक्षांनी राजकीय घात व प्रतिघातापासून त्यास दूर ठेवावे. परंतु ही परंपरा पंडित जवाहरलाल नेहरु च्या जीवन काळापर्यंतच शाबूत राहिली. १९६० च्या दशकापासून राज्यात आघाडी शासनाचा उदय झाला. ज्यामुळे भारतीय संघराज्य व्यवस्थेवर पक्षीय राजकारणाच नकारात्मक प्रभाव पडला. परंतु या विकृत वाटचालीची वास्तविकता इंदिरा गांधी शासन काळापासून स्पष्टपणे जाणवू लागली. या युगात संविधानातील तरतुदीचा कुटिलपणे दुरुपयोग करुन राज्य शासनास अस्थिर व कमकुवत केले. ज्यापालाच्या संवैधानिक गोरवशाली पदाची राजकारण करुन त्यास राज्यांविरुद्ध केंद्रोच यंत्र म्हणून वारले परंतु वर्तमानात देशात प्रचलित आघाडी राजकारणाचे स्वरुप बऱ्याच प्रमाणात संघात्क ढाच्याप्रमाणात योग्य वातावरण निर्माण करण्यात अयशस्वी राहले. समकालीन आघाडी राजकारणाने देशात राज्यशासनाच्या स्वायंत्तता व सन्मानाल वाचविण्यात यशस्वी राहिले. त्यांनी केंद्र शासनास संघीय व्यवस्थे संबंधीत घटनात्मक तरतुदीसोबत कसल्याही प्रकारची छेडछ करण्याबाबत सावधान केले.

**भारतीय आघाडीचे राजकारण :**

आघाडीच्या राजकारणाचा उदय भारतात १९६० दशकापासून सुरु झाला. जेव्हा पहिल्यांदा केरळमध्ये बिगर पक्षाच्या आघाडीने शासन बनवले वास्तवतेत या अगोद

अशा प्रकारच्या राजकारणाची कोणीही शक्यत यर्तवली नव्हती. स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख पक्ष असल्यामुळे स्वातंत्र्यानंतर देशात कॉंग्रेस हाच एकमेव पर्याय होता. तत्पश्चात झालेल्या अनेक निवडणूकीत पक्षाला अभूतपुर्व समर्थन मिळाले. तर इतर राजकीय पक्षांना कॉंग्रेससमोर उभे टाकण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागले. परंतु वर्तमानात परिस्थिती वेगळी आहे.

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीपासून ते मे २०१६ च्या पाच राज्याच्या निवडणूकीपर्यंत कॉंग्रेस फक्त ०६ राज्यातच सत्तेवर शिल्लक राहिली. केंद्रात तर विरोधी पक्षाचा मान मिळवण्या इतपत जागाही कोण्या एका पक्षाला मिळाल्या नाहीत. स्वातंत्र्य सैनिकांचा त्याग व बलिदानाच्या आधारे आणि पंडित जवाहरलाल नेहरुंच्या प्रभावशाली नेतृत्वात स्वातंप्यानंतर जवळपास दोन दशकानंतरही कॉंग्रेस भारतीय राजकारणाचा केंद्रबिंदू राहिली. यादरम्यान केंद्र व राज्यस्तरावर जेवढयाही निवडणूका झाल्या त्यात पक्षाने बहुमत प्राप्त करुन सरकार बनवले. विरोधी पक्ष फक्त आपली उपस्थिती लावण्यात संतोष मानव होता. त्यामुळेच याकाळात भारतीय संघराज्यास संवैधानिक तरतुदींना आपली पाळेमुळे खोलवर रुजवण्याची संधी मिळाली. संविधानकर्त्यांच्या अपेक्षानुरुप केंद्र-राज्य संबंध मधुर व एकमेकास पुरक स्वरुपात स्थापन केले. कॉंग्रेस पक्षातून भारतीय जनमानसाचा अपेक्षाभंग १९६० च्या प्राथमिक वर्षापासून होवू लागला. तरीही पंडित नेहरूंच्या राजकीय प्रभावाखाली असल्यामुळे लोक पार्टीपासून पुर्णत: दूर राहिले नाहीत. तरीही केरळ सारख्या राज्यात बिगर-कॉंग्रेसी पक्ष विशेषत: साम्यवादी पक्षाचा अधिक प्रभाव वाढला होता हे कॅंग्रेसला प्रभावी उत्तर देण्याच्या स्थितीत पोहचले. परंतु कॉंग्रेस या विशाल वटवृक्षाला यशस्वी आव्हान देण्याचे सामर्थ्य कोणत्या एका राजकीय पक्षात नव्हते.

त्यामुळेच कॉंग्रेसला एक प्रभावी पर्याय बनण्याच्या प्रयत्नातून बिगर-कॉंग्रेसी पक्षांनी हात मिळवणी केली. त्यातुनच भारतात आघाडी राजकारणाचा उदय झाला. ज्याचा प्रभाव २०१४ च्या लोकसभा निवडणूकीपर्यंत राहिला. तरीही केरळात बनलेले पाहिले आघाडी शासनाचे बिगर कॉंग्रेसी स्वरुप फक्त त्या राज्यापुरतेच मर्यादित राहिले. देशातील इतर राज्यात कॉंग्रेसच सत्ताधारी पक्ष म्हणून पुढे आले. वास्तवतेत केरळच्या प्रतीकात्मक प्रयोगाला आखिल भारतीय स्वरुप तेव्हा मिळाले जेंव्हा हिंदी भार्षीक राज्यात समाजवादी पक्षाने आघाडी करुन कॉंग्रेसला कडवे आव्हान दिले. त्यामुळे भीष्मरुपी कॉंग्रेसला या राज्यात सत्तेपासून दूर ठेवण्यात यश आले. अशाप्रकारे राज्यात आघाडी राजकारणाचा उदय बिगर कॉंग्रेसी पक्षाच्या आपापसातील समन्वयातून कांग्रेसला सत्तेपासून दूर करुन आघाडी शासन बनवण्यामुळे झाला. ज्याच्या मुळात अनेक घटकाप्रमाणे बिगर कॉंग्रेसवाद सर्वात प्रमुख आहे.

केंद्रीय स्तरावर आघाडी राजकारणाचा सर्वात प्रथम यशस्वी प्रयोग आणीबाणीनंतर श्रीमती इंदिरा गांधीच्या शासनास पदच्युत करण्यासाठी करण्यात आला. या प्रयोगात प्रथम देशात वामपंथी व दक्षिणपंथी दोन्ही विचारसरणीच्या पक्षांनी जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडी शानात शामील होवून बिगर कॉंग्रेसी पक्षाचा ठोस पर्याय दिला. त्यामुळेच १९७७ च्या सर्वसाधारण निवडणूकीत कॉंग्रेसच दारुण परभव झाला. देशात पहिल्यादांच जनता पक्षाच्यारुपाने बिगर कॉंग्रेसी आघाडी शासन केंद्रात सत्तेवर आले. या शासनातंर्गत असलेल्या विरोधामुळे हे सरकार अधिक काळ टिकून राहू शकले नाही. त्यामुळे भारतीय राजकारणातील एका ऐतिहासीक प्रयोगाचा दु:खद शेवट झाला. या अयशस्वी प्रयोगाने मात्र हे सिध्दि केले नाही. आता देशात बिगर कॉंग्रेसी शक्ती प्रभावी झाल्या. त्यांच्यात कॉंग्रेसला कडवे आव्हान देण्याची क्षमता आहे. गरज फक्त त्यांनी आपापसात सहकार्य वाढवण्याची आहे. कारण कोणत्याही एका पक्षाच्या तुलनेत कॉंग्रेस तेव्हाही अपराजीत पक्ष होता.

भारतात सर्वसाधारणपणे आघाडी राजकारणाची पायाभरणी १९८९ च्या सार्वत्रिक निवडणूकानंतर झाली. तेव्हा कोणत्याही एका राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळत नाही तेंव्हा अशा स्थितीत आघाडी शासनाच्या निर्मितीस प्रारंभ झाला. त्यांनतर भारतीय राजकारण वास्ववतेत आघाडी राजकारणाचे कुरुक्षेत्र बनले. ज्यास नरेद्र मोदी नावाच्या अभिमन्युने २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत मोडले. आघाडी राजकारणाला देशात महत्त्वाचे कारणांनी केला. प्रथम या आघाडी राजकारणाच्या युगात सहकार्य करणाऱ्या पक्षांची जेवढी आवश्यकता विरोधी पक्षाला आहे. त्यापेक्षा कितीतरी पटिने अधिक आवश्यकता सत्ताधारी पक्षाला आहे. त्यामुळे कॉंग्रेसने संयुक्त पुरोगामी आघाडी (युपीए) आणि भाजपाने राष्ट्रीय लोकशाी आघाडी (एन.डी.ए) बनवून आपापल्या बाजूने अनेक सहकारी पक्षाना ओढण्याचे कर्य केले. ज्यामुळे ते सत्ताधारी पक्ष बनण्यासाठी आवश्यक बहुमत जोडू शकतील. २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत एकटया भारतीय जनता पक्षाला स्पष्ट बहूमत मिळाले. तरीही भाजपाने आपल्या जुन्या व नव्या मित्रपक्षांना सत्तेत सहभागी करुन घेतले. त्यांना तसा वाटा दिला. कदाचित हा विचार येणाऱ्या काळातील आघाडी शासनाचे सुचक असेल किंवा कॅंग्रेसमुक्त गरज आहे. दुसरे समकालीन आघाडी शासन एका प्रकारे १९६० च्या आघाडी राजकारणाचे उलट रुप प्रस्तुत करते, त्या दशकात केंद्रात कॉंग्रेसचे शक्तिशाली एकपक्षीय शासन होते. तर राज्यात आघाडी शासन कार्यरत होते. त्याच्या एकदः



SADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

उलट परिस्थिती १९८९ पासून निर्माण झाली. ज्यात राज्यात एकपक्षीय शासन होते. तर केंद्रात आघाडी शासनाचा बोलबाला होता. अशा प्रकारे देशातील प्रस्तुत आघाडी राजकारण देशात दिवसे दिवस बदलत्या राजकीय ध्रुवीकरणाचे द्योतक आहे. ज्याचा भारतीय संघराज्य व्यवस्थेवर निश्चित आणि व्यापक प्रभाव पडला. या प्रभावास सकारात्मक व नकारात्मक या दोन मुद्याअंतर्गत विश्लेषणात्मक पध्दतीने प्रस्तुत करता येते.

**आघाडी शासनाचा संघराज्य व्यवस्थेवर पडणारा सकारात्मक प्रभाव :**

आघाडी राजकारणाने भारतीय शासन आणि राज्यघटनेला अनेक प्रकारे प्रभावित केले. या प्रभावाचे मुळ स्वरुप केंद्र शासनाव्दारे संघराज्य व्यवस्थेशी संबंधित संवैधानिक तरदतुदीचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करण्याच्या सीमाव्दारे निर्धारित होते. उदा : संविधानातील कलम ३५६ चा वापर अधिक प्रमाणात केद्र शासनाच्या मनस्थितीवर अवलंबून असते. बोम्मई प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतरही या तरतुदीच्या क्रियान्वयात राज्यपालाच्या माध्यमातून केद्र सरकारला विवेकाधीन अधिकार प्राप्त झाले. परंतु केंद्र शासनाच्या या सर्वक्रियांवर सर्वात मोठे नियंत्रण संसदेत त्यांचे बहुमत नसणे आहे.त्याचे कारण आहे की, असे सर्व पर्यायाचे अनुमोदन, संसदेव्दारे आवश्यक आहे की, ज्याच्या अनुपस्थितीत हे सर्व पर्याय असंवैधानीक ठरवले जातील महत्वाचे असे की, संसदेत केंद्र शासनाच्या बहुमतांची स्थितीपुर्वी सहयोगी पक्षाच्या सहकार्यात्मक दृष्टिकोनावर निर्भर होती. जर सहकारी पक्ष एखादया विषयावर आघाडी शासनाच्या निर्णयाशी असहमत असतील तर शासन त्या मुद्यावर कोणताही ठोस निर्णय घेवू शकत नाही. अशाप्रकारे आघाडीचे राजकारण केंद्र शासनाच्या स्वेच्छाचारी व विवादास्पद धोरणावर अंकुश लावण्याचे एक अतिश्य महत्वाचे माध्यम बनत आहे.

आश्चर्यजनक बाब आहे की, आघाडी राजकारणाने भारतीय संघराज्य व्यवस्थेशी संबंधीत संवैधानिक तरतुदींना केद्र शासनामार्फत योग्य आदर व सन्मान देण्यासाठी विवश केले आहे. यात काहीच दुमत नाही की, बऱ्याच संकटकालीन परिस्थितीचा खंबीर सामना करण्यासाठी राज्यघटनेने अनेक अशा तरतुदी केल्या ज्यामार्फत केंद्र शासनास विवेकाधिन अधिकार प्राप्त होतात. या शक्तिचा कोणत्या प्रकारे दुरुपयोग होवू शकतो याची प्रचिती इंदिरा गांधीच्या पंतप्रधान काळात पहाण्यास मिळते. तत्कालीन केंद्र शासन ही आपल्या शक्तिचा व्यापक दुरुपयोग करण्याच्या लालसेपासून स्वतःला रोखु शकत नाहीत. फक्त अट एवढीच आहे की, त्यांच्याकडे संसदेत संपूर्ण बहुमत असावे. आताच्या मोदी शासनाकडे ते आहे. त्यामुळेच उत्तराखंडमध्ये या शासनाने बरेच उलटसुलट कारनामे केल्या. मागील आघाडी शासनाचा विचार करता ते भारतीय संघराज्य व्यवस्थेसाठी एक वरदान म्हणून पुढे आले ज्यामुळे संघराज्याबाबतच्या घटनात्मक तरतुदीचे पालन होत आहे.

भारतीय संघराज्य व्यवस्थेत आघाडी राजकारणाने प्रथम राज्यात सन्माजनक स्थान मिळविले. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर स्वतःला दुय्यम दर्जाची संस्था मानव्याऐवजी प्रथमच राज्यशासन संघराज्य व्यवस्थेंच्या संचलनात सक्रिय आणि प्रभावी भुमिका बजावत आहेत. एक वेळ होती की जेव्हा राज्याच्या बाबतीत अधिकतम निर्णय दिल्लीतील पक्ष व शासनाच्या नेत्यामार्फत घेतले जात होते. तसेच राज्यशासन त्या निर्णयांची अंमलबजावणी करणारी मूक यंत्रणा बनले होते. परंतु आता स्थिती पुर्णतः विपरित बनली आहे. ज्यात केंद्र शासनाच्या विभिन्न मुद्याविषयीचे निर्णय राज्याच्या राजधानीत होत आहेत. केद्र शासन अशाप्रकारच्या निर्णयाची आतुरतेने वाट बघत आहे. सिध्दांततः एक खऱ्या संघराज्याची मुलभूत भावना असते की, त्या राष्ट्राच्या सामाजिक - आर्थिक विकासाच्या प्रमुख घटनाविषयी निर्णय राज्याने करावा. केंद्राने त्या निर्णयाच्या यशस्वीतेत सक्रीय भुमिका बजावावी. भारतीय संघराज्य व्यवस्थेची ही एक हरवलेली घटीका आहे. परंतु ही काही प्रमाणात स्पष्ट बहुमतातून मोदी शासनाने मिळवली. परंतु ते राज्याच्य विकासात सक्रिय मदतकारी भुमिका बजावेल का याबाबत ही अद्याप शंकाच आहे. आघाडी राजकारणाने संघाज्यातील केंद्र शासनाच्या दादागिरीला नरमाईत पुर्नस्थापित करण्यात महत्वाची भुमिका बजावली. तसेच त्याची दिशाही ठरवली. निश्चित रुपात देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासाच्या मुलभूत प्राथमिकतांना निर्धारित करण्याचे अधिकार केंद्राव्दारा नियंत्रित योजना अयोगा (नीति आयोगा) जवळ असतो. परंतु आघाडी राजकारणामुळे अशा प्रकारच्या ध्येयाचे निर्धारण मन मानेल आणि क्षुद्र राजकारणातुन प्रेरित घटनाद्वारे न होता आपापसातील विचारविनिमय आणि योग्य मार्गाने देशाच्या समग्र विकासाच्या ध्येयाला ध्यानात ठेवुन केला जातो. आघाडी राजकारणाचा हाच परिणाम आहे की, केंद्रामार्फत राज्यांना देण्यात येणारे विशेष आर्थिक सहकार्य (पॅकेज) आता केवळ त्याच राज्यांना दिले जाते ज्यांचा केंद्रातील शासनात सहभाग आहे. तसेच अनेक विरोधी पक्षाचे शासन करणारे राज्य उदा.उत्तरप्रदेश आणि बिहार आर्थिक सहकार्य पॅकेज मिळवण्याबाबत आशादायी आहेत. ज्याचा उल्लेख २०१५ च्या बिहार विधानसभेतील निवडणुकीत मोदीनी स्वतःच्या भाषणात केला.

सारांशतः तार्किकदृष्टया विचार करता भारतात आघाडयांचे राजकारण सबल होण्याने देशाचे संघराज्य व्यवस्थेत उत्पन्न दोष

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

आणि क्षुद्र राजकारणाने बऱ्याच प्रमाणात नष्ट करण्यासाठी मदत झाली. तसे केंद्र शासनाच्या वर्चस्ववादी भुमिकेवर अंकुश लावल. तसे केंद्र शासनाच्या महत्वाचे निर्णय आणि नीतीगत निर्णयात राज्य शासनाची भागीदारी निश्चितच वाढली आहे. याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, केंद्र आणि राज्य शासन परस्पराचे प्रतिस्पर्धी न होता परस्परास पुरक कार्य करण्यास तत्पर बनले. केंद्र-राज्य संबंधात बऱ्याच काळापासुन चालत आलेल्या अडथळयात राज्यपालाचे पद, कलम ३५६ चा वापर, अखिल भारतीय प्रशासकीय सेवांवर नियंत्रण इ. विषय आता मागे पडले किंवा त्यांची प्रासंगिकता राहिली नाही. परंतु सध्याच्या केंद्रातील बहुमतातील शासनाकडून मागील दोन वर्षात उत्तराखंडात कलम ३५६ चा वापर होताना दिसुन आला. संवैधानिक तरतुदीचा अधिक उल्लंघनाचा विषय आता वजा होताना दिसतो. अंततः घटनाकर्त्यांच्या अपेक्षानुसार केंद्र व राज्य शासन परस्पराचे विरोधी व स्पर्धक होण्याऐवजी सहकारी व मदतकारी कार्य करण्यास उत्सुक बनत आहेत.

**आघाड्यांच्या राजकारणाचा भारतीय संघराज्य व्यवस्थेवर नकारात्मक प्रभाव.**

आघाड्यांच्या राजकारणाच्या प्रचलनामुळे एकाबाजुने भारतीय संघराज्य व्यवस्थेत केंद्र शासनाच्या बाजुने सतत झुकणारे ध्रुवास संतुलित करण्यास महत्वाची भुमिका बजावली. तर दुसऱ्याबाजुने सामान्य राज्यव्यवस्थेवर कांही नकारात्मक प्रभाव टाकले आहेत. यात प्रामुख्याने केंद्र शासनाची अवस्था धोरणात्मक दृष्ट्या लकवा मारल्यासारखी झाली. दुसऱ्या शब्दात सहकारी पक्षातील ओढाताण व केंद्र शासनाकडून आपली स्वार्थप्रेरित व व्यक्तिगत अपेक्षामुळे अनेक आघाड्यांचे सहकारी घटक शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यापासुन सतत रोखतात. यामुळे देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांशी संबंधित अनेक धोरणात्मक निर्णय लांबणीवर पडत आहेत. अशा वेळेस केंद्र शासन आपल्या घटनात्मक व राजधर्माप्रती उत्तरदायित्वाचे निर्वाहन करण्यात सर्वथा कमकुवत ठरत आहे. उदा. मागील बऱ्याच वर्षापासुन देशाच्या आर्थिक विकासाचा दर अधिक कमी होत आहे. त्यामुळे महागाई तीव्र गतीने वाढत आहे. अशा परिस्थितीत भारतासह जगही केंद्र शासनाकडून कांही कठोर निर्णय घेण्याची अपेक्षा करत आहे. परंतु विरोधी पक्ष किंवा आघाडीतील अनेक सहकारी पक्षाचा कठोर विरोध व धमकीपूर्ण वागण्याने हतबल होवुन केंद्र शासन या समस्यासमोर मुकदर्शक बनत आहे. जेंव्हा त्यांच्याकडून कांही आर्थिक अडथळे दूर करण्याचा प्रयत्न होतो, त्यावेळेस आघाडीतील सहकारी पक्ष लगेच विरोधी भावना व्यक्त करतात. यामुळे केंद्र शासनाच्या प्रयत्नात प्रारंभापासुनच अडचणी येतात. त्यामुळे त्यांचे प्रयत्न विशिष्ट ध्येय साध्य करु शकत नाहीत. अशा प्रकारची धोरणात्मक लकव्याची स्थिती भारतासारख्या विकसनशील देशासाठी निश्चितही दुर्भाग्यशाली आहे. जागतीकीकरण व उदारीकरणाच्या युगात जेंव्हा जगातील अधिकांश देश आपल्या अर्थव्यवस्थेत नवे बदल करुन आर्थिक विकासास नवे आयाम देण्याच्या प्रयत्नात आहेत. भारतासाठी अशी कठिण स्थिती धोकादायक आहे.

आघाडी राजकारणाचा भारतीय संघराज्य व्यवस्थेवर पडलेला नकारात्मक प्रभाव देशाच्या विदेश व सुरक्षा धोरणांवर स्पष्टपणे जाणवतो. देशाच्या विभित्र भौगोलिक सिमांशी जोडलेले राज्य, तेथील राजकीय पक्ष केंद्र शासनाच्या आघाडीतील महत्वपुर्ण भागीदार असतात. ते पक्ष आपल्या अंतर्गत राजकारणामुळे राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणचे योग्यपणे संचलन करुन देत नाहीत. त्यात अडथळे आणतात. तसेच परराष्ट्र धोरणात बदल करण्यासाठी दबाव आणतात. याबाबतीत पश्चिम बंगालमधील तृणमृल काँग्रेस, तामिळनाडुतील द्रविड मुन्नेत्र कळघम, केंद्र शासनावर क्रमशः बांग्लादेश व श्रीलंके संबंधात परराष्ट्र धोरण ठरवण्याच्या बाबतीत दबावाचे राजकारण करतात. वास्तवतेत भारता शेजारी असताना देशास बांग्लादेश व श्रीलंकेसारख्या देशासोबत आपली मैत्री अधिक वाढवण्याची आवश्यकता भासते. या उपमहाद्विपातील सर्वात महत्वपुर्ण देश असल्यामुळे भारतास जर कांही सवलती दयावा लागल्या तरी त्यास तयार रहावे लागते. परंतु जर अशाप्रकारच्या परराष्ट्र धोरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडून बनवला असेल तर वरील राज्यातील संबंधीत राजकीय पक्ष, केंद्र सरकारवर दबाव टाकण्यास प्रारंभ करतात. यामुळे केंद्र शासनास आपल्या परराष्ट्र धोरणात संपुर्णतः मुलभूत बदल करावा लागतो.

अशाचप्रकारच्या दुर्बलतेचा परिचय केंद्र शासनास अंतर्गत सुरक्षेच्या संचलनात पाहण्यास मिळतो. ज्याचे मुळ कारण आघाडी शासनात सहभागी घटक पक्षाचा प्रखर विरोध समजले जाते. याचे प्रमुख उदाहरण म्हणजे केंद्र शासनामार्फत प्रस्तावित राष्ट्रीय दहशतवाद विरोधी केंद्राच्या स्थापनेस आघाडीत सहभागी पक्ष व विरोधी पक्षाचा सतत विरोध आहे. आज दहशतवाद देशांतर्गत सुरक्षेसमोरील एक महत्वाची समस्या म्हणुन पुढे येत आहे. याचा प्रभाव कमी करण्यासाठी अनेक प्रकारच्या राष्ट्रीय आणि स्थानिक संस्थांची आवश्यकता आहे. त्यामुळेच राष्ट्रीय दहशतवाद विरोधी केंद्राची कल्पना मांडण्यात आली. वर्तमान प्रस्तावीत राष्ट्रीय दहशतवाद विरोधी केंद्राच्या रचनेत कांही संघात्मक मुद्दे समाविष्ट आहेत. परंतु या विषयाला कोणताही विचार विनिमय न करता रद्द करने चिंतेचा विषय आहे. भारताच्या अंतर्गत सुरक्षेला मजबुत करण्यासाठी केंद्र

शासनास या विधेयकाला पास करुन घेणे महत्वाचे आहे. केंद्र शासन ते करेल ही परंतु वर्तमान आघाडी शासनात केंद्र शासनाने एकतर्फी घेतलेला कोणताही निर्णय शासनावरच प्रश्नचिन्ह निर्माण करतो. त्यामुळे आपली संपूर्ण इच्छा असुनही केंद्र शासन या विषयावर सहकारी पक्षाच्या सहमतीशिवाय कोणतेही पाऊल टाकण्यास तयार होत नाही. आघाडी शासनाने केंद्र शासनाच्या निरंकुश व स्वेच्छाचारी निर्णय घेण्याच्या सवयीवर अंकुश लावण्याचे महत्वाचे कार्य केले. परंतु या राजकारणास मर्यादेपेक्षा पुढे घेवुन जाण्याचा कांही पक्षाचा प्रयत्न बऱ्याच वेळा केंद्र शासनाच्या न्युनतम व अनिवार्य विषयावर निर्णय होण्याच्या क्षमतेस नष्ट करते. अशा प्रकारे एक अशी अनिर्णायक स्थिती केंद्र शासनासमोर निर्माण होते जी कोणत्याही स्थितीत देशाच्या सामाजिक, आर्थिक विकास व राजकीय कुटनीतीच्या संचलनास उपयुक्त नसते. त्यामुळेच लोकांनी युपीए - १ व २ मधील आघाडी राजकारणास कंटाळून २०१४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदीच्या नेतृत्वाखाली स्पष्ट बहुमतातले सरकार निवडुन दिले. परंतु या शासनास राज्यसभेत बहुमत नसल्यामुळे अनेक निर्णय घेण्यात अडचण येते.

**निष्कर्ष :** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ज्या संघराज्य व्यवस्थेची निर्मिती भारतीय संविधानाच्या निर्मात्यांनी देशाच्या विविधता आणि विभिन्नतेला समोर ठेवुन देशाला एक योग्य शासन व्यवस्था देण्यासाठी केला होता. त्यात जवळपास ६७ वर्षादरम्यान अनेक अपेक्षित आणि अनपेक्षित असे दोनच प्रकारचे परिवर्तन झाले. या बदलापैकी शासनाच्या अधिकार व कार्याचे अधिकाधिक केंद्राच्या हाथात एकीकरण करणे हा महत्वाचा अनपेक्षित बदल होता. त्याचे कारण की या परिस्थितीत अनेक राज्य सरकारे आपली सर्वाधीक तरतुद आणि अधिकाराशिवाय केंद्र शासनाची कटपुतली म्हणुन व्यवहार करण्यास विवश झाले होते. या दरमयान देशात आघाडी राजकारणाने भारतीय संघराज्य व्यवस्थेला एक नवा आयाम दिला. ज्याने केंद्र - राज्य संबंधातील दुरावा नष्ट केला. तसेच राज्यांना अधिकाधिक शक्तिशाली बनवुन केंद्र शासनास बऱ्याच प्रमाणात आपल्या संवैधानिक चौकटीत मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला. यामुळेच केंद्र शासनाची अवस्था दिवसेंदिवस कमकुवत झाली. आज केंद्र शासनावर आघाडीतील सहकारी पक्षाच्या दबावामुळे धोरणात्मक लकव्याने त्रस्त झाल्याचा आरोप लागला आहे. अशा प्रकारची धोरणात्मक शुन्यता देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात अडथळा ठरते. यामुळे आघाडी राजकारणाच्या मर्यादाशिवाय केंद्र शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यात कसलीही भिडभाड ठेवु नये. तसेच आघाडीत सहभागी पक्षांनीपण आपला दबाव एका विशिष्ट मर्यादेपर्यंत ठेवावा. अन्यथा देशात फक्त आघाडी राजकारणाचा विषय ठरेल आणि अपमानाचा बनेल. तर देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाची दशा व दिशा या दोघांचे अभूतपूर्व नुकसान होईल.

संदर्भ :

१) विचारमंथन महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका २२ वे वार्षिक औरंगाबाद अधिवेशन विशेषांक - अतिथी संपादक - प्रा.अशोक नाईकवाडे मार्च - २००५

२) भारतीय राजकारण दृष्टिक्षेप - संपादक नागोराव कुंभार - प्रबोधन प्रकाशन, लातुर - एप्रिल २००२

३) संयुक्त आघाडीतुन स्थिर सरकारकडे - या.दा.रानडे - सुगावा प्रकाशन, पुणे - २०००

४) भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरिक्षा - लेखक - माधव गोडबोले - अनुवाद - सुजाता गोडबोले - राजहंस प्रकाशन, पुणे - २०१२

५) देश - प्रदेश प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा - सुहास पळशीकर युनिक अकॅडमी, पुणे - एप्रिल - २०१४

६) संसदीय लोकतंत्र - सफल या असफल ? आचार्य बालचंद्र गोस्वामी प्रखर - राज पब्लिशिंग हाऊस - जयपूर - २००७

७) Democracy & Good Governance - Ranjan Modi - Mangal Deep Publication - Jaipur - २००४

□□□

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

ISSN 2319-5843

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education

# VISION RESEARCH JOURNAL FOR POLITICAL SCIENCE & PUBLIC ADMINISTRATION

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - V, Issue - IX, Vol. I (Feb. 2016 To July 2016)

EDITOR IN CHIEF

DR. SARJERAO SHINDE

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

ISSN 2319-5843

International Registered & Reconized
Research Journal Related to Higher Education

# VISION RESEARCH JOURNAL FOR POLITICAL SCIENCE & PUBLIC ADMINISTRATION

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - IX, Vol. I
Year - V (Half Yearly)
(Feb. 2016 To July 2016)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 02382 - 241913
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Dr. Sarjerao Shinde
Principal,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur, Dist. Latur,
Dean, Faculty of Social Sciences, M.C. Member,
S.R.T.M.U. Nanded (M.S.) India

EXECUTIVE EDITOR

Dr. Rajpal Bhullar
Dept. of Political Science,
S.L.D.A.V. College,
Ambala City, Dist. Ambala (H.R.)

Dr. Jayanta Baruah
Dept. of Pol. Science,
H. B. College,
Jamugurihat, Dist. Sonitpur
(Assam)

DEPUTY EDITOR

Dr. M. Veera Prasad
Professor, Dept. of Pol.Sci. & P.A.,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

Dr. Huen Yen
Head,Dept. of Inter Cultural
& International Relation,
South Central University,
Changsha City, (CHAINA)

Gangadhar Hingole
Ex. Head, Dept. of Political Science
Dayanand College,
Latur, Dist. Latur, & Leader,
M. Fucto (M.S.)

Dr. Manik D. Sonawane
Head, Dept. of Pol. Science,
Tilak Maharashtra University,
Pune, Dist. Pune (M.S.)

CO-EDITOR

Dr. Sanjeevan Kadam
Head, Dept. of Political Sci.,
D.S.M. College,
Jintur, Dist. Parbhani,
Chairman,
BOS in Political Sci.,
S.R.T.M.U. Nanded. (M.S.)

Dr. S. M. Selukar
Head, Dept. of Pol. Science,
Vitthalrao Patil College,
Kale, Dist. Kolhapur (M.S.)

Issue : X, Vol. I
VRJFPSPA Half yearly Research Journal
ISSN 2319-5843
Feb. 2016 To July 2016

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Pandit Nehru and India's Foreign Policy | Dr. Sanjay S. Sapkal | 1-7 |
| 2 | अन्तर्राष्ट्रीय सम्बंधों में नयी ऊर्जा के आधार पर मोदी सरकार की विदेश नीति | डॉ. श्रीमती कल्पना वैश्य | 8-12 |
| 3 | अहमदनगर जिल्ह्यातील राजकारण एक दृष्टीक्षेप | विलास भारत बनसोडे | 13-16 |
| 4 | महात्मा बसवण्णा आणि लोकशाही मूल्ये | डॉ. रत्नाकर बाबूराव लखाटे | 17-23 |
| 5 | पंचायतराज व्यवस्थेच्या माध्यमातून महिला विकासाची वाटचाल | अर्चना ज्ञा. पाटील | 24-30 |
| 6 | दुष्काळाचे अन्वयार्थ | भरत मधुकर नलगे | 31-35 |
| 7 | पंचायतीराज संस्था आणि राज्य सरकारचे प्रशासकीय नियंत्रण | डॉ. गोविंद यमलवाड | 36-40 |
| 8 | भारतीय राजकारणातील नवीन बदल | डॉ. व्ही. जे. विळेगावे | 41-49 |
| 9 | इंदिरा गांधी - राजकीय व प्रशासकीय वाटचाल | डॉ. डी. एम कदम | 50-53 |
| 10 | लोकप्रशासनात : ई - गव्हर्नन्सची भुमिका | डॉ. भाग्यश्री एल. दाणे | 54-55 |
| 11 | महात्मा गांधी यांचे विचार आणि भारताची राजकीय व्यवस्था | डॉ. स्मिता काशिनाथराव गरयाळीकर | 56-58 |
| 12 | आपत्ती व्यवस्थापन - एक विश्लेषणात्मक अभ्यास | बळवंत विष्णु घोगरे | 59-64 |

Issue : IX, Vol. I
VRJFPSPA
ISSN 2319-5843
Feb. 2016 To July 2016

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

4

# महात्मा बसवण्णा आणि लोकशाही मूल्ये

डॉ. लखदे रत्नाकर बाबूराव
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,देगलूर
ता.देगलूर जि.नांदेड

*Research Paper -Political Science*

महात्मा बसवेश्वर हे भारतातील दुसरे महात्मा होत ज्यांचा जन्म मध्ययुगातील दक्षिण भारतात बागेवाडी येथे इ.स. ११०५ साली झाला. बसवेश्वरांनी आपल्या ह्यातभर प्रस्थापितांची कटुता पत्करुन वैदीक व सांस्कृतीक अहिंसावादी लढा दिला. या लढयाने पुढे फुले, शाहू, आंबेडकर या समतावादी लढयाला गती व नव परिमाण मिळाले. महात्मा बसवेश्वरांच्या विचार व कार्याचा विचार करता त्यांनी वैदीक धर्मव्यवस्थेत सुधारणा करताना सामाजिक मूल्यांचे भान सोडले नाही. त्यामुळेच समाज सुधारणेमागची त्यांची वैचारीक भूमिका व्यापक प्रश्नांचे संदर्भ घेवून येते. वैदीक समाजव्यवस्था जातीप्रथा आणि तिचे संवर्धन करणारे तत्वज्ञान व व्यवस्था यांचा त्यांनी विरोध केला. प्रस्थापितांच्या विचारव्युहाच्या उच्चाटणाची भुमिका बसवेश्वरांनी १२ व्या शतकात प्रस्थापित असूनही मांडली हे विशेष. प्रस्थापितांचे उच्चाटन करुन त्याजागी त्यांनी मांडलेल्या मूल्यधिष्ठित वचन साहित्य व कार्याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

बसवेश्वरांनी समाजव्यवस्थेच्या परिवर्तनासाठी आपल्या वचनातून मूल्यधिष्ठित वैचारिक ग्रंथाचा परित्याग केला नाही. महात्मा बसवेश्वरांच्या तत्वज्ञानात स्वातंत्र्य, समता, बंधुता, नैतिकता, मानवता, सत्य, अहिंसा या तत्वाचा उल्लेख सातत्याने येतो. प्रजाप्रभुत्वाची राज्यव्यवस्था, वैदीक धर्मव्यवस्थेची चिकित्सा, लिंगायत धर्म, अनुभवमंटप, कायक वे कैलास, इष्टलिंग, दासोह, एकदेवोपासना, देहच देवालय या विविध संदर्भिय अंगाने केलेल्या वचनरुपी लिखानात स्वातंत्र्य, समता, बंधुता ही त्रिसुत्रे समान रुपात दिसुन येतात. उपनयन संस्कारास विरोध करताना समाज धुरीणांसोबत केलेला युक्तिवाद, अनुभव मंटपातुन विविध विषयावर केलेले विचार मंथन, बसवेश्वरांच्या प्रेरणेने प्रेरित होवून वचन मांडणाऱ्या शरणांचे वचन साहित्य, आंतरजातीय विवाहानंतर राजा बिज्जलाशी

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



केलेला संवाद तसेच बसवेश्वरांनी रचलेली वचने १,९६,००० या सर्वातून त्यांच्या स्वातंत्र्य समात, बंधुता या लोकशाही मुल्या विषयीचे मत प्रकट होते. याचा अर्थ बसवेश्वरांनी लोकशाही मुल्यांचा पुरस्कार जीवनाच्या एखाद्या क्षेत्रापुरता न करता संपुर्ण ह्यातभर व सामाजिक व्यवहाराच्या सर्व क्षेत्रासाठी केला. बसवेश्वरांच्या दृष्टिने ही लोकशाही मुल्ये सर्वव्यापी व सर्वस्पर्शी आहेत. बसवेश्वरांनी स्वातंत्र्य, समाता, बंधुतेस जीवनाचे आदर्श मानले. हा कोणाचा हा कोणाचा, हा कोणाचा असे मज न म्हणवी देवा, हा आमुचा हा आमुचा हा आमुचा असे म्हणवी देवा या वचनातुन बसवेश्वरांनी लोकशाही मुल्यविषयीचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वाच्या आधारावरच मानवी समाज व समतावादी नवसमाजाची निर्मिती केली. वचन साहित्यातून स्वातंत्र्य, समता व बंधुता इ.मूल्य व्यक्तीच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. वैदिक धर्माचे तत्वज्ञान लोकशाही मुल्यांच्या कसोटीवर तपासले. न्याय म्हणजे स्वातंत्र्य, बंधुता व समानता असे स्पष्ट करुन धार्मिक तत्वज्ञानाचे मुल्यमापन व मांडणी या मुल्याच्या आधारावरच करावी अशी भुमिका बागेवाडी, कूडलसंगम, मंगळवेढा व कल्याण येथील वास्तव्यात घेतली. मानवाच्या सर्वांगिण विचाराचा आधार स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता असावा अशी कृतिशील सुचना अनुभव मंटपातुन केली. कायक वे कैलास व दासोह तत्वज्ञानातून अर्थव्यवस्थेला मानवतावादी नियोजनाचे तत्व लागु करण्याचा आग्रह धरला. आर्थिक परिवर्तन करताना अर्थव्यवस्थेला मुल्याधिष्ठित स्वरुप प्राप्त करुन दिले. राज्यसंस्था व नागरिकांनी समाजवादी धोरण राबवावे तसेच समाजवादी कार्यक्रम आखावा. बसवेश्वरांनी राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात प्रजाप्रभुत्वाची व्यवस्था निर्माण केली. समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्याच्या हक्काच्या उपभोग योग्य पध्दतीने घेता यावा. खाजगी मालमत्तेच्या संग्रहामुळेच हक्काचे केंद्रीकरण घडते. खाजगी संपत्ती किंवा संपत्तीच्या केंद्रीकरणाचा विचार मानवाला मूल्यविरहीत बनवतो. विज्जल राजाच्या इच्छेनुसार महामंत्री पदाचा राजीनामा देण्यात आणि कल्याण नगरी सोडुन जाण्यात बसवेश्वरांची मुल्याधिष्ठित भुमिका स्पष्ट होते. समान न्याय व हक्क, व्यक्ति स्वातंत्र्याची जोपासना, सर्वांना समान संधी आणि भितीमुक्त मानवी जीवन व समाजाची निर्मिती करण्याच्या हेतूनेच अनुभवमंटपातून मार्गदर्शक तत्वाची आखणी केली.

एकंदरीत बसवेश्वरांच्या जीवनातील प्रत्येक घटनेत, लिखानात स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मुल्यांचे महत्व आढळुन येते. सर्व मानवी संबंध या मुल्यांवर आधारित असावेत. १२ व्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी आपल्या लिंगायत धर्माला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या सर्वकालिक तत्वाचे खरेखुरे अधिष्ठान प्राप्त करुन दिले आणि लिंगायत धर्माचा मानवतावादी दृष्टिकोन पक्का केला. आजच्या लोकशाहीला पोषक असे हे त्यांचे महान कार्य होते. त्यांची ही वैदिक तत्वे आज स्वतंत्र भारताच्या लोकशाहीत समाविष्ट झाली आहेत. त्यामुळे साऱ्या भारतीयांना

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded



महात्मा बसवेश्वराचे स्मरण होणे अगदी स्वाभाविक आहे. शरण विराजदार यांच्या मते हिंदु समाजातील अस्पृश्यतेचा कलंक पुसला जावा यासाठी प्रयत्नशील असलेले बसवेश्वर हे आद्यसंत होते. पुरोगामी विचारसरणी हा त्यांच्या धार्मिक व सामाजिक क्रांतीचा कणा होता. समानता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुता या तत्वाचं बसवेश्वर हे मुर्तिमंत प्रतिक होते. महात्मा बसवेश्वरांच्या धर्म चिकित्सेतुन राजकीय, सामाजिक व आर्थिक व्यवस्थेतील मानवी मुल्यांचे प्रतिबिंब स्पष्ट होते. तसेच समाजकारण, राजकारण, अर्थकारण आणि विशेष म्हणजे मानवी वर्तनाला या लोकशाही मुल्यांचा आधार असावा असा बसवेश्वरांचा आग्रह होता.

**स्वातंत्र्य :**

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांना अखिल मानव जातीच्या कल्याणाचा स्पर्श आहे. लोकशाही मुल्यांची प्रस्थापना व्हावी म्हणून बसवेश्वर वचनातून म्हणतात सदाचार असे स्वर्ग, अनाचार वे नरक, अंतरंग बहिरंग शुध्दी हिच कूडलसंगमदेवास जाणण्याची खरी रीत होय. तत्कालीन सर्व प्रस्थापीत अभिजनवादी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मुल्यांची उपेक्षा करीत होते. बसवेश्वरांच्या मते बहुजनाना गुलामगिरीच्या पाशातुन मुक्त करुन माणुस म्हणून जगण्याची समान संधी देणे आणि त्यास पुरक सामाजिक व राजकीय हक्कांची वचनातून मांडणी करणे पुरेसे नाही. तर त्या हक्काचा उपयोग कसा करावा याची क्षमता आणि संधी त्यांना असावी यावर अनुभवमंटप व इष्टलिंगाच्या माध्यमातुन बसवेश्वरांनी भर दिला.

व्यक्ती विकासाच्या संधी प्रत्यक्ष उपलब्ध करुन दिल्यासच स्वातंत्र्याचा फुलोरा फुलेल बसवेश्वरांच्या स्वातंत्र्यात समाजातील अभिजनांच्या विशेषाधिकारांना नाकारुन शोषित, अस्पृश्य जनसमुहानी अंगी स्वातंत्र्य उपभोगण्याचे सामर्थ्य आहे. महात्मा बसवेश्वरांच्या वचनातून स्वातंत्र्यास पुरक असणाऱ्या मुलभुत हक्काचे चिंतन व्यक्त होते. बसवेश्वरांच्या मुलभुत हक्कांना पारंपारिकतेपेक्षा आधुनिक मुल्यांचा स्पर्श होता. राज्यसंस्थेने आणि त्या अंतर्गत काम करणाऱ्यांनी जनकल्याणांची धोरणे राबवावीत. ज्युळे सर्वच मानवांना विशेषतः सामान्य माणसाला स्वातंत्र्याचा उपयोग येईल. आर्थिक समतेशिवाय स्वातंत्र्याची संकलपना वंचित राहते. कारण पोटापाण्याच्या विवंचनेत व माणूस म्हणून जगण्यासाठी धडपड करण्याच्या प्रकियेत तत्कालीन बहुजनांना आपल्या व्यक्ती स्वातंत्र्याबरोबर इतर सर्वच मुलभूत हक्कांचा त्याग करावा लागला. अशी परिस्थिती समाजातील कोणत्याच मानवावर येऊ नये म्हणून सर्वांनीच श्रम करुन स्वावलंबी जीवन जगावे.समाजातील अंध अपंग,वृध्द व महिला पुरुष जे असहाय्य आहेत किंवा अत्यंत गरीब आहेत त्यांच्या पोटापाण्याची सोय करण्याची जबाबदारी राज्य व सामाजिक आर्थिक अभिजनांनी घ्यावी त्यासाठी दासोहाच्या तत्वज्ञानाचा अंगिकार करावा. बसवेश्वरांच्या समाजातील बहुजनांचा मुलभूत हक्काची खरी किंमत माहित आहे. कारण त्यांनाच त्यापासून दूर ठेवण्यात आले होते. व्यक्तीला आत्मोन्नतीची पुर्ण

Mahatma Basaveshwar Kamgar Vyapari Education Society's, Degloor College, Degloor, Dist. Nanded

मोकळीक देणे म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्य संकल्पनेतरा धोका राज्यसंस्थेच्या सत्तेमार्फतच होत असतो. राजकीय क्षेत्रात समता निर्माण करण्यासाठी प्रजाप्रभुत्वाची व्यवस्था असावी लागते. महात्मा बसवेश्वर तत्कालीन राजेशाही व सरंजामशाहीच्या व्यवस्थेकडे चिकित्सक दृष्टीने पाहतात आणि वचनातून तिच्या प्रत्यक्ष व्यवहाराची मिमांसा करताना राजेशाही व्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या ब्राह्यण्यवाद्यांचा समाचार घेताना बसवेश्वर म्हणतात की, राजाने धर्म व्यवस्थेच्या म्हणजेच उच्चवर्णीच्या (पुरोहीत ब्राह्मण) आत्मस्तुतीच्या जाळयात न आडकता सेवकाच्या भुमिकेत राहून कार्य करावे. कारण राज्यकर्ता मालक बनून जनतेला जे स्वातंत्र्य उपभोगण्यास देईल ते स्वातंत्र्य उच्चभ्रुच्या आत्मिक विकासाचे असते. धर्मशास्त्र व अर्थशास्त्राच्या चाव्या हातात असणाऱ्यांच्या उपयुक्ततेचे व कल्याणाचे असते. यावरुन असे म्हणता येईल की महात्मा बसवेश्वर स्वातंत्र्य ही संकल्पना मर्यादित अर्थाने वापरत नव्हते.सामान्य जनतेचे रक्षण, शोषण व गुलामीपासून मुक्तता होवून माणूस म्हणून जगण्यास पोषक वातावरण मिळणे म्हणजे स्वातंत्र्य होय.

**समता:**

समता या मुल्यांच्या उल्लेख महात्मा बसवेश्वरांच्या वचनात अनेक ठिकाणी आढळून येतो. वैदीक समाजव्यवस्थेच्या चतूर्वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था हा त्यांना समता आणि स्वातंत्र्यांच्या स्थापनेतील मुख्य अडथळा वाटतो. त्यामुळेच वर्ण व जातीच्या निर्मिती अशी झाली या विषयीचे चिंतन त्यांनी खालील वचनातून केले विठाळ विना पिंडास नये आश्रय जलबिंदुचा एकच व्यवहार अशा, अमिषा, रोष, हर्ष, विषयी आदी सर्वांना एकच काय वाचून-काय ऐकून काय फल ? काय तयाचे सार ? आधार ते कोणते कुलीन म्हणण्यास ? सप्तधातू सम पिंडम् समयोनि समुभदवम । आत्मजीव समायुक्तम वर्णानाम किम् प्रयोजनम् ॥ लोहार झाले लोखंड तपवून धाबी झाले अपडे धूवून कोष्टी झाले कापड विणून, ब्राम्हण झाले वेद वाचून, कानातून जन्मले या जगी कोण ? या कारण कुडलसंगमदेवा, लिंगस्थल मर्म जाणलेलाच कुलीन या वचनात बसवेश्वरांनी सर्व मानवजातीच्या जन्माची रीत एकच, जन्मानंतरच्या सर्वाच्या शारिरीक व मानसिक हालाचाली एकाच प्रकारच्या असताना, वर्णव्यवस्थेला अर्थ नाही. जातीयतेची निर्मिती व्यससायाच्या आधारे झाली. वर्ण व जन्माच्या आधारे नाही. ब्राहाणापासून शुद्रापर्यत भवी असलेले सर्वजण मी एकच समजतो यातून बसवेश्वरांनी मानवाचे मानवत्व मान्य करणारा आणि नाकारणारा हे दोनच वर्ग समाजात आहेत. अशी गुणवाचक समतानिहाय समाज विभागणी केली. जातीव्यवस्थेमुळे तत्कालीन भारतीय समाज विस्कळीत झाला होता. वैदीक समाजव्यवस्थेचा विषमाधिष्ठित व्यवहार आणि त्याला मान्यता देणारे विषमतामुलक वैदीक तत्वज्ञान त्याच्यावर वचन साहित्यातून प्रकाश टाकणारे पुरोगमी चिंतन बसवेश्वरांनी केले. उपनयन संसकारास विरोध ही कृती स्त्री पुरुषांच्या समान धार्मिक हक्कांचा लढा आहे. समाज व राज्यव्यवस्थेत सर्वाना समान हक्क, प्रतिष्ठा व दर्जा असावा. व्यक्तिचे मोजमाप

माणूस म्हणून व्हावे. पद व प्रतिष्ठेच्या साहयाने होवू नये. सर्वांना समान वागवावे. उदा. बसवेश्वरांनी चोरी करण्यास आलेल्या चिक्कय्या मारेकऱ्यांस,माई किंवा पत्नीचे दागीने चोरणाऱ्या चोरास आणि बिज्जल दरबारातील मधुवरस, नारायण कमीत या सर्वांना समान दिली. समतेचे तत्व वादग्रस्त आहे. संपूर्ण समता शक्य नाही असे समतेच्या तत्वज्ञानाविषयी म्हटले जाते. पण बसवेश्वरांनी १२ व्या शतकात मांडलेलया परस्त्री व परधन नरकासमान, अंतरंग बहिरंग शुध्दता सदाचार चे स्वर्ग, अनाचार चे नरक, कनिष्ठ जातीत जरी जन्मला विचार त्यांचा चांगला तर त्याचा संग करावा. कायक चे कैलास, दासोह, एकदेवोपासना, देह हेच देवालय, दया हेच धर्माचे मुळ, धनाचा विनीयोग सत्कार्यासाठी इ. तत्वाचा वापर केला. तर समतेचे तत्व समाजात रुजू शकते. समतेच्या तत्वांसाठी बसवेश्वरांनी अहिंसात्मक व विवेकवादी सारखेपणाचा आग्रह धरला. त्यामुळेच कल्याण नगरीत १८ पगड जातीतील बहुजन समाज गुण्यागोविंदाने जीवन जगत होता. पृथ्वीवरील समतेचा स्वर्ग १२ व्या शतकात कल्याणनगरीत अवतरला समतेचे तत्वज्ञान बसवेश्वरांच्या ह्दयस्थानी विराजमान होते. बसवेश्वर म्हणतात. डोहार तो कक्कय्या असे पितृस्थानी । पितामह मानी मोची चनयासी । तसेच मादार चन्नय्या के दास का पुत्र ढोर कक्कय्या की दासी पुत्री. दोनो काम करणे खेत गये वहाँ दोनो ने संभोग कया और इससे मेरा जन्म हुआ ।

या वचनातून अस्पृश्याच्या पोटी माझा जन्म झाला, सांगून अस्पृश्य व माझ्यात काहीच फरक नाही. कारण ते ही माणूस मी ही माणूस दोघांचाही जन्म संभोगातूनच हातो. त्यामुळे मला तुमच्या पेक्षावेगळा मानून मला दूर करु नका अशी आळवणी कूडसलसंगमदेवास साक्षी मानून करतात. समतेच्या कृतीशील उपक्रमाचा शेवट चांभार हरळयाच्या पुत्र ब्राह्मण मधुवरसाची कन्या यांचा आंतरजातीय विवाह घडवून केला.

**बंधूता :**

स्वातंत्र्य, समता यांच्यापेक्षा बसवेश्वरांना बंधुता महत्वाची वाटते. बंधुतेच्या भावनेचा स्वीकार सर्व मानवांनी केल्यास स्वातंत्र्य व समतेवर होणारे हल्ले आपोआप दूर होतात. असा बसवेश्वरांचा विश्वास होता. त्यामुळे बसवेश्वरांनी धर्माची व्याख्या दया हेच धर्माचे मुळ आहे अशी केली. आपल्या सभोवतालच्या मानव प्राणीमात्रां बद्दलचे दयावादी प्रेम, स्वातंत्र्य व समतेच्या विरुध्दच्या हल्याविरुध्दची खरी हमी आहे. बसवेश्वरांनी बधुंतेचा भाव निर्माण व्हावा म्हणून करु नका चोरी करु नका हत्या खोटे बोलू नका कोणवर रागवू नका कोणचा अनादर करु नका आत्मप्रशंसा करु नका दुसऱ्याची निंदा करु नका हिच अंतरंग शुध्दी आहे हिच कुडलसंगमदेवतास प्रसन्न करुन घेणारी रीत आहे. या वचनातून सामाजिक बांधिलकी व सलोखा वाढविण्यासाठी वरील सप्तसुत्रीचा स्वीकार आचार व विचारात करावा असे सांगितले आहे. अहिंसात्मक जीवन बंधुता प्राप्तीची पहिली अट आहे. असे बसवेश्वरांना वाटते. बंधुतेमुळे समाजात संवाद सहकार्य आणि

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

Issue : IX, Vol. I
VRJFPSPA
Half yearly Research Journal
ISSN 2319-5843
Feb. 2016 To July 2016

सहजीवन यांना वाव मिळतो. समाज सकारात्मक विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करतो. बंधुत्वादी समाजाचे उद्दिष्ट एकच असते. बंधुतेच्या यशस्वितेसाठी समाजात मानसिक एकात्मता असावी बंधुभावामुळे समाज आंतरीक उर्मीतून एकत्र येतो. बसवेश्वरांनी मंगळवेढा कल्याण येथील प्रशासकीय कारकीर्दीत समाजात परस्पराबद्दलचा आदर, आपलेपणा आणि प्रेम म्हणजेच बंधुभाव या भावना विकसीत केल्या. बंधुतेस मानवाच्या नैसर्गिक स्थायीभाव मानले. सर्वजन आपल्यासारखे माणूस आहेत. माणूस म्हणून मला ज्या इच्छा, भावना, गरजा, संवेदना आहेत. तशाच त्या इतरही मानवांच्या असतात. हा भाव कायक, दासोहाच्या माध्यमातून कल्याणनगरीतील जनतेत निर्माण केला. त्यामुळेच प्रस्थापीत व्यवस्थेचा भाग असणाऱ्यांचा बसवेश्वरांच्या सर्व शरणांनी गौरव केला. अनुभव मंटपात आलेल्या अक्कमहादेवीस माते समान मानले. अस्पृश्य असणाऱ्या म्हावी हडपद अप्पणास सचिव म्हणून नेमले. चांभार हरळय्यास नम्रतापुर्वक झुकून शरणू शरणार्थ असे वंदन अभिवादन केले. आपल्यासाठी कातडयाची पादत्राणे बनविणाऱ्या चांभार हरळय्याची पादत्राणे डोक्यावर ठेवून संपूर्ण कल्याणनगरीस प्रदक्षिणा घातली. मादीदेव कांबळीच्या घरी भोजन केले. बसवेश्वरांनी मानवजातीच्या शारिरीक, मानसिक व बौध्दीक शक्तीचा उपयोग सामूहिकपणे करावयाचा असले तर गावकूसा बाहेर राहणाऱ्यांना आपलंसं वाटेल असे वागणे समाजधुरीणांचे कर्तव्य आहे असे निक्षून सांगितले. सहभावनेच्या प्रेरणेतून समाज एकरस होतो. एकरस होण्याच्या प्रक्रियेत परोपकाराच्या भावनेपेक्षा व्यक्तिप्रतिष्ठेची भावना होती. बसवेश्वरांच्या बंधुतेच्या तत्वानागे न्याय, हक्काच्या पुर्ततेचा आग्रह आहे. कायक वे कैलासच्या माध्यमातून सर्वांनी शारिरीक श्रम करुन स्वावलंबी जीवन जगावे हा विचार मांडून ऐतखाऊ वर्ग, कष्टकरी वर्गात बंधुतेचा भाव निर्माण केला. दासोहाचा विचार समाजातील श्रीमंत वर्गात गरीब, वंचित, असहाय्य लोकांच्या कल्याणाविषयी प्रेम व हिताचा विचार निर्माण करतो. दासोह श्रीमंत व गरीब ही दरी नष्ट करुन मानवा मानवात प्रेम, सहकार्य, सहजीवन, सदाचार या सद्गुणांची निर्मिती करतो. स्वातंत्र्य, समता व बंधुता या सामाजिक मुल्यांविषयी निव्वळ तात्वीक चर्चा करणे बसवेश्वरांचा हेतू नव्हता.तसेच या सामाजिक मुल्यांचा अंगीकार स्वतःच्या सामाजिक, राजकीय, कौटूंबिक जीवनात करुन ही मुल्ये समाजात रुजतील हे बसवेश्वरांना पटत नव्हते. बसवेश्वरांनी स्वातंत्र्य, समता व बंधुता या सामाजिक मुल्यांना समाजाभिमुख बनविण्यासाठी पंचाचार व अष्टावरणाच्या मार्गावर चालणारे ७७० शरण अनुभवमंटपातून निर्माण केले. यातच बसवेश्वरांचे मोठेपण व श्रेष्ठत्व आहे. बसवेश्वरां व्यतिरिक्त इतर कोणत्याही समाजसुधारकाला जिवंतपणी आपल्या तत्वज्ञानावर चालणारा एवढा मोठा कृतीशील समूदाय निर्माण करता आला असावा असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सामाजिक मुल्याधिष्ठित समाज निर्मितीच्या कार्यात ७७० शरण व १,९६,००० जंगमांनी बसवेश्वरांना मोलाचे सहकार्य केले. बसवेश्वरांच्या कार्याची यशस्वीता या ७७० शरणावरच अवलंबून आहे. असे म्हटले तर चुकीचे होत

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

नाही. ७७० शरणांपैकी ७० महिला होत्या. ज्या नित्यनियमाने सत्य,शुध्द व प्रामाणिक कायक करुन अनुभव मंटपात सामाजिक, राजकीय प्रश्न व मानवाच्या वर्तनाविषयी चिंतन करत. एक-एक शरण महात्मा गौतम बुध्दांचा भिक्खु व महात्म गांधीच्या सत्याग्रही समान होता. भारतीय समाजात मुल्याधिष्ठित व्यवस्था निर्माण करण्यासाठी जातीव्यवस्था मोडली पाहिजे आणि जातिव्यवस्थेच्या उच्चाटनासाठी चतुर्वर्ण व्यवस्था नष्ठ केली पाहिजे असे प्रतिपादन बसवेश्वर करतात.

स्वातंत्र्य समता, बंधुता, न्याय अहिंसा, दया, नैतिकता व मानवता मुल्यांना जीवनाचा अविभाज्य भाग माननारा एक जाती व वर्णवरिहीत गुण व कर्मावर आधारीत समताधिष्ठित समाज निर्माण करण्यात बसवेश्वरांना १२ व्या शतकात यश आले. त्यामुळे स्वातंत्र्य, समता व बंधुता ही फ्रेंच राज्यक्रांती व पश्चिमात्य तत्वज्ञानाच्या उदरातून जन्मास आलेली मुल्ये आहेत हा इतिहास भारतीयांनी आळवण्याऐवजी बसवेश्वरांच्या १२ व्या शतकालीन स्वातंत्र्य, समजा, व बंधुतेच्या यशस्वीतेसाठी जगण्याचा व इतरांसाठी जगण्यांचा संघर्ष अभ्यासावा एवढेच शेवटी म्हणावे वाटते

## संदर्भ सूची

१. समाजसुधारक महात्मा बसवेश्वर - डॉ.अशोक मेनकुदळे.

२. Basweshwar & his Times - Dr.P.B.Desai

३. युग प्रवर्तक महात्मा बसवेश्वर - प्रा.भिमराव पाटील

४. परिवर्तनाचा महामेरु महात्मा बसवेश्वर - डॉ.सच्चिदानंद बिचेवार

५. बसव पथ.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded